**जिल्हा परिषद धुळे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धुळे आयोजित**

# शिष्यवृत्ती सराव परीक्षा क्रमांक 1

**दिनांक – 05 डिसेंबर 2023 विषय :- पेपर क्रमांक 1 इयत्ता :- 5 वी**

**प्रश्न एक ते तीन साठी सूचना**

पुढील उतारा वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायातून निवडा

विद्यार्थ्याला गीता सांगते तुला जर विद्या प्राप्त करायची असेल तर तुझ्याजवळ प्रणीपात म्हणजे नम्रता परिप्रश्न म्हणजे जिज्ञासा आणि सेवा या तीन गोष्टी असल्या पाहिजेत नम्रते शिवाय ज्ञान मिळत नाही एकाच गुरु द्रोणाचार्य चे शिष्य दुर्योधन व अर्जुन यांच्यातील तफावत ही गोष्ट फार चांगल्या प्रकारे समजावते विद्या विनय शोभते त्याचप्रमाणे जिज्ञासा म्हणजे जाणून घेण्याची इच्छा जर शिष्यत नसेल तर गुरु किती महान असला तरी तो त्याला ज्ञान देऊ शकत नाही शेवटी मिळालेले ज्ञानही गुरु सेवेत वापरले तरच त्याचा सुगंध येतो शिवाय जो श्रद्धावान व संयमी असतो त्याला ज्ञान प्राप्त होते

प्रश्न 1) विद्या मिळवण्यासाठी कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे ?

1) संयम 2) पैसा 3) सेवा,नम्रता, व जिज्ञासा 4) वेळ

प्रश्न 2) ‘जिज्ञासा’ या शब्दाला दुसरा कोणता शब्द उताऱ्यात आला आहे?

1) नम्रता 2) प्रणिपात 3) सेवा 4) परिप्रश्न

प्रश्न 3) ‘ विद्या विनयन शोभते ’ या सुवचनाचा अर्थ पुढीलपैकी कोणता ?

1) विद्या नसेल तर शोभा नाही.

2) विद्येमुळे व्यक्ती शोभून दिसते.

3) शोभून दिसते ती विद्या असते.

4) नम्रतेने ज्ञानाला शोभा येते.

प्रश्न 4) शब्दकोडे सोडून अचूक पर्याय निवडा

| | | |
|---|---|---|
| | उ | |
| सं | | म |
| | म | |

1) त 2) क 3) प 4) ग

प्रश्न 5) जय जवान! जय किसान ! जय विज्ञान! ही महत्त्वाची घोषणा कोणी केली?

1) लालबहादूर शास्त्री 2). पंडित जवाहरलाल नेहरू 3) सरदार वल्लभभाई पटेल 4) अटल बिहारी वाजपेयी

प्रश्न 6) ‘ डोंगर पार करून जावे लागले ' या वाक्यातील काळ ओळखा

1) भूतकाळ 2) वर्तमान काळ 3) भविष्यकाळ 4) साधा काळ

प्रश्न 7) योग्य विधेय वापरून वाक्य पूर्ण करा

चंदू ने....

1) इकडे ये 2) मैदानावर गेला 3) छान चित्र काढले 4) अक्षर सुंदर आहे

प्रश्न 8) खालील वाक्यातील विरामचिन्ह ओळखा

गाढवाला गुळाची चव काय ?

1) उद्गारवाचक 2) स्वल्पविराम 3) प्रश्नचिन्ह 4) अवतरण चिन्ह

प्रश्न 9) मुलगा, मौन, मंगल, मित्र या शब्दांचा वर्णमालेनुसार शब्द क्रम लावल्यास दुसऱ्या क्रमांकाचा शब्द कोणता?

1) मित्र 2) मौन 3) मुलगा 4) मंगल

प्रश्न 10) पुढीलपैकी शुद्ध शब्दाचा पर्याय निवडा

1) लहाण 2) शिक्षण 3) परिक्षा 4) भूमि

प्रश्न 11) दिलेल्या अर्थाचा योग्य अलंकारिक शब्द असणारा पर्याय निवडा

भित्रा माणूस-

1) मेषपात्र 2) शेंदाड शिपाई 3) शकुनी मामा 4) कुंभकर्ण

प्रश्न 12) लिंग वचनानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा

1) लांडोर 2) खुर्ची 3) शाळा 4) घर

प्रश्न 13)' व्हिजन' या शब्दाला पर्यायी मराठी शब्द निवडा

1) पडदा 2) दृष्टी 3) तबकडी 4) उपग्रह

प्रश्न 14) खालील वाक्यातील रिकाम्या जागी येणाऱ्या उत्तराचा पर्याय निवडा

अमितला --------घेऊन दिल्या

1) वह्या 2) सायकल 3) पेन 4) दप्तर

प्रश्न 15) पुढील चौकोनातील म्हण ओळखून त्या म्हणीचा अर्थ पर्यायातून निवडा

| | | |
|---|---|---|
| घा | डे | दो |
| क | तु | क |
| ए | न | व |

1) खूप मारहाण करणे

2) तडका फडके निर्णय घेणे

3) अतिशय रागावणे

4) खूप यातना सहन करणे

प्रश्न 16) 'नयना' सकाळी पाच वाजता <u>उठते</u>

अधोरेखित शब्दाची जात ओळखा

1) नाम 2) क्रियापद 3) विशेषण 4) सर्वनाम

प्रश्न 17) जोड शब्दांच्या गटात न बसणारा शब्द ओळखा

1) भोळाभाबडा 2) साथसंगत 3) वारकरी 4) उलटसुलट

प्रश्न 18) प्राणी व निवारा योग्य जोडीचा पर्याय निवडा

1) कोंबडी-पिंजरा 2) सिंह-ढोली 3) मधमाशी-घरटे 4) मुंगी-वारूळ

प्रश्न 19) शब्दसमूहाबद्दल एक शब्द असणारा पर्याय निवडा

25 वर्षांनी साजरा केला जाणारा महोत्सव

1) हिरक 2) अमृत 3) रौप्य 4) सुवर्ण

प्रश्न 20) समानार्थी शब्दाची अचूक जोडी ओळखा

1) सूर्य-भास्कर 2) सम-विषम 3) राघू मैना 4) कठोर-मृदू

प्रश्न 21) ' कान देणे ' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थाचा पर्याय निवडा

1) आनंदी होणे 2) लक्षपूर्वक ऐकणे 3) दुर्दैव ओढवणे 4) नाराज होणे

प्रश्न 22) पुढीलपैकी पिल्लू दर्शक शब्दाची चुकीची जोडी असणारा पर्याय ओळखा

1) कुत्र्याचे-पिल्लू 2) माणसाचे -लेकरू 3) शेळीचे-करडू 4)वाघाचा छावा

प्रश्न- 23 ते 25 साठी सूचना

खालील सुसंगत परिच्छेदात रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा

प्रश्न 23) चंद्राच्या प्रकाशाला-----म्हणतात

1) चकोर 2) उजेड 3) चांदणे 4) प्रकाश


प्रश्न 24) चंद्र हा पृथ्वीचा-----आहे

1) उपग्रह 2) ग्रह 3) सोबती 4) मित्र

प्रश्न 25)-------ला चंद्रबिंब अजिबात दिसत नाही

1) चतुर्थी 2) अष्टमी 3) पोर्णिमा 4) अमावस्या

26) खालील आकृती दुमडून घन तयार केल्यास A हे चिन्ह असलेल्या पृष्ठभागाचा विरुद्ध पृष्ठभागावरील चिन्ह कोणते?




1)E 2)B

3)F 4)D

27) 85053 या संख्येतील 5 अंकांच्या स्थानिक किंमतीतील फरक किती?

1)5050 2)450 3)4950 4)4550

28) सव्वा तेराशे रुपयांचा शर्ट, पावणे सातशे रुपयांची पॅन्ट व सव्वा अडतीस रुपयांचा रुमाल खरेदी केल्यास एकुण खर्च किती?

1)2238.25 2)2238.75 3)2038.25 4)2038.75

29) 180 चा शेकडा 30 म्हणजे किती?

1)45 2)54 3)60 4)540

30) दोन संख्यांच्या बेरजेची चौपट बरोबर 112 आहे यापैकी एक 15 आहे तर दुसरी कोणती?

1)14 2)16 3)12 4)13

31) $\frac{4}{5}$ या अपूर्णांकात $\frac{4}{5}$ किती वेळा मिळवल्यास बेरीज 4 येईल?

1)5 2)4 3)20 4)6

32) 2 रिम - 5 डझन = ----- कागद

1)960 2)900 3)960 4)906

33) पाच अंकी सर्वात मोठी विषम व पाच अंकी सर्वात लहान विषम संख्या यांच्यातील फरक किती?

1) 98998 2) 89998 3) 99988 4) 99898

34) 2 किलो ग्रॅम = -------- डेसि ग्रॅम

1)200 2)2000 3)20,000 4)2,00,000

35) खालीलपैकी कोणती जोडी चुकीची आहे?

1)XV=XX-V 2)XV=XXV-X 3)XV=X+V 4)XV=XI+V

36) 4730, 4548, 4479, 4088 या संख्या उतरत्या क्रमाने मांडल्यास दुसऱ्या संख्येतील शतक स्थानचा अंक कोणता येईल?

1)4 2)5 3)7 4)8

37) 1, 8, 27, 64, ?

1)128 2)125 3)81 4)256

38)



सोबतच्या आकृतीत किती रेषाखंड आहेत?

1)30 2)26 3)28 4)42

39) 53 * 3 या संख्येला 3 ने निःशेष भाग जातो तर * च्या जागी कोणता अंक येईल?

1)5 2)6 3)4 4)8

40) 21.376, 21.306, 21.360 व 21.367 हया संख्या उतरत्या क्रमाने मांडल्यास तिसऱ्या क्रमांकावर कोणती संख्या येईल?

1)21.376 2)21.306 3)21.367 4)21.360

41) कुसुमने 2014 मध्ये बालिका दिनापासून जागतिक महिला दिनापर्यंत दररोज 2 लिटर दुध घेतले तर तिने एकूण किती लिटर दूध घेतले?

1) 65ली. 2) 130ली. 3) 120ली. 4) 110ली.

42) सोमवारी 13:30 ला सुटलेली रेल्वे मंगळवारी 9:30 वाजता पोहोचली तर रेल्वेचा एकुण प्रवास किती?

1)20 तास 2) 18 तास 3) 19 तास 4) 17 तास

43) एक कपाट 4500 रुपयाला घेवून त्याचा वाहतूक खर्च 200 रुपयाला आला. ते कपाट 4380 रुपयास विकले तर या व्यवहारात नफा झाला की तोटा ? व किती?

1) रु 320 नफा 2) रु 320 तोटा 3) रु 480 नफा 4) रु 480 तोटा

44) द. सा. द. शे. किती दराने रू 15oo ची 3 वर्षात रु 1860 रास होईल?

1)8% 2)12% 3)10% 4)6%

45) 5, 7, 8 हे अंक प्रत्येकी एक एकदा वापरून तयार होणाऱ्या सर्व संख्याची बेरीज किती?

1)4440 2)2020 3)4040 4)2220

46) (* * * ) X ( * *) = 10989 गुणाकारातील सर्व $*$ च्या जागी सारखाच अंक आहे, तर तो अंक कोणता?

1)7 2)3 3)4 4)5

47) एका टोपलीत काही फुले आहेत, 12 मुलांना प्रत्येकी सारखी फुले वाटली, तर 8 फुले उरतात, तेवढीच फुले 14 मुलांना सारखी वाटली तर 10 फुले उरतात तर त्या टोपलीत असणाऱ्या फुलांची कमीत कमी संख्या किती?

1)30 2)28 3)80 4)84

48) रिकाम्या $*$ जागी योग्य संख्या कोणती? $\frac{13}{*} = \frac{104}{72}$

1)8 2)9 3)72 4)104

49) पुढीलपैकी सर्वात लहान अपूर्णांक कोणता? $\frac{6}{7}, \frac{3}{4}, \frac{4}{5}, \frac{2}{3}.$

1) $\frac{3}{4}$ 2) $\frac{2}{3}$ 3) $\frac{4}{5}$ 4) $\frac{6}{7}$

50) एका गोठ्यात शेकडा 40 म्हशी आहेत , एकूण प्राणी 400 असतील तर म्हशी किती?

1) 230 2) 320 3) 203 4) 160

51) सोबतची बेरीज पूर्ण होण्यास△ ○ □ या साठी अनुक्रमे कोणते अंक घ्यावे?

| | |
|---|---|
| | △ ○ □ |
| + | △ ○ □ |
| + | △ ○ □ |
| | 4 4 4 |

1)1,5,6 2)1,4,8

3)1,8,4 4)1,5,8


52) दर 5 मीटर वर एक याप्रमाणे रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावायची आहेत तर 1.5 कि.मी लांबीच्या रस्त्यावर किती झाडे लागतील?

1)602 2)1200 3)600 4)598

53) एका संख्येला 25 ने गुणण्याऐवजी चुकून 52ने गुणले तेव्हा गुणाकार मूळ गुणाकारापेक्षा 540 ने जास्त आला; तर ती संख्या कोणती?

1)18 2)27 3)20 4)30


54) सोबतच्या आकृतीत एकूण त्रिकोण किती आहे?



1)15 2)12

3)13 4)16

55) सोबतच्या आकृतीत दोन-दोन बिंदू जोडून आणखी जास्तीत जास्त किती रेषाखंड काढता येतील?



1)15 2)18 3)21 4)12

56) एका आयताकृती बागेची लांबी 220 मी व रुंदी 180 मी आहे. नरेश त्या बागेभोवती 4 किमी चालला तर त्याने किती फेऱ्या मारल्या?

1)10 2)6 3)8 4)5

57) 50 रुपयांच्या नोटांच्या पुडक्यात अनुक्रमे 37695 पासून 37734 पर्यंत क्रमांक आहेत; तर एकुण रक्कम किती?

1) 4000रु 2) 2500रु 3) 2000रु 4) 2500रु

58) एक मोटार एक लिटर पेट्रोल इंधनात 23 किमी चालते, तर तिला 4094 किमी अंतर कापण्यास किती लिटर पेट्रोल लागेल?

1)178 2)188 3)179 4)189

59) 80 पानी पुस्तकाची $\frac{2}{5}$ भाग पाने वाचायची राहिली तर एकूण किती पाने वाचून संपविली?

1)32 2)16 3)64 4)48

60) ऐंशी लक्ष आठ हजार आठ ही संख्या अंकांत कशी लिहाल?

1)808008 2)800808 3)8008008 4)80008008

61) 6 + 24 X 24 ÷ 6 - 3=?

1)117 2)198 3)94 4)99

62) 50.5 + 4.04 + 0.303 = ?

1)54.546 2)54.843 3)548.43 4)54.834

63) एका खोलीला चौरसाकृती 400 फरश्या बसवल्या आहेत जर फरशीची प्रत्येक बाजू निम्मी केली, तर किती फरश्या लागतील?

1)200 2)100 3)800 4)1600

64) तीन क्रमवार नैसर्गिक समसंख्या आहेत सर्वात लहान संख्येची 5 पट सर्वात मोठ्या संख्येच्या तिपटीपेक्षा 28 ने जास्त आहे. तर त्या संख्या पैकी मधली संख्या कोणती?

1)18 2)20 3)22 4)24

65) बरोबर 10:30 वाजता घड्याळातील दोन काट्यांमध्ये किती मापाचा कोन तयार होईल?

1)$135^o$ 2)$130^o$ 3)$120^o$ 4)यापैकी नाही

66) 12 मजुरांना एक काम करण्यास 12 दिवस लागतात तर 8 मजुरांना ते काम करण्यास किती दिवस लागतील?

1)6 2)8 3)18 4)20

67) एका आयताची परिमिती 56 सेमी असून त्याची लांबी 16 सेमी आहे, तर त्या आयताचे क्षेत्रफळ -------- चौसेमी आहे.

1)10 2)26 3)896 4)192

68 ते 70 साठी सूचना- प्रमाण 1 चित्र = 5 विद्यार्थी

| खेळ | खेळणारे खेळाडू |
|---|---|
| फुटबॉल | ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ |
| टेबलटेनिस | ☆ ☆ ☆ |
| हॉकी | ☆ ☆ ☆ ☆ ☆ |
| क्रिकेट | ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ |

68) टेबल टेनिस पेक्षा हॉकी खेळणारे खेळाडू कितीने जास्त आहेत?

1)5 2)2 3)10 4)25

69) हॉकी व क्रिकेट खेळणारे एकूण विद्यार्थी किती?

1)60 2)12 3)120 4)6

70) फुटबॉल खेळणारे खेळाडू क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूपेक्षा कितीने कमी आहेत?

1)5 2)1 3)3 4)4

71) जिच्या आरंभी 7 हा अंक आहे व प्रत्येक अंक एकदाच वापरलेला आहे, अशी 5 अंकी मोठ्यात मोठी सम संख्या कोणती?

1)79998 2)79856 3)78756 4)79658

72) 18 X 4 - 6 □ 70 X 2 ÷ 2 - 4 चौकोनांच्या जागी कोणते चिन्ह येईल?

1)< 2)> 3)= 4)यापैकी नाही

73) $\frac{5}{*}+\frac{3}{*}=1$ असेल तर $*$ च्या जागी पुढीलपैकी कोणता अंक असेल?

1)8 2)5 3)3 4)2

74) 8 चौ. मीटर = किती चौ. सेमी?

1)800 2)8000 3)80000 4)80

75) 72.045 मधून किती वजा करावेत, म्हणजे बाकी 46.965 राहील?

1)119.01 2)26.08 3)25.18 4)25.08

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी)

## Pre Secondary Scholarship Examination (Std. 8th)

### सरावासाठी उत्तरपत्रिकेचा नमुना / Sample Answer Sheet For Practice

विद्या गुरूणां गुरुः।

Centre No.: **PRE-PRINTED**
Seat No. : **PRE-PRINTED**
Medium : **PRE-PRINTED**
Block No. : **PRE-PRINTED**

प्रश्नपत्रिका संचकोड अचूक नोंदवावा ☐

प्रश्नपत्रिका संचकोड वर्तुळ अचूक रंगवावे

(A) (B) (C) (D)

संचकोड अचूक नोंदविलेबाबत पर्यवेक्षकाची स्वाक्षरी

1 2 3 4 5 6 7 8 9

ही वर्तुळे विद्यार्थी/पर्यवेक्षकाच्या वापरासाठी नाहीत.

**सर्वसाधारण सूचना :**

१. पेन्सिलने नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.
२. प्रत्येक प्रश्नाच्या समोरील उत्तराचा योग्य पर्याय वर्तुळात नोंदविताना काळ्या किंवा निळ्या रंगाच्या बॉलपेनचाच वापर करावा.
३. 'दोन अचूक पर्याय निवडा' अशी सूचना दिलेल्या प्रश्नांच्या बाबतीत दोन्ही अचूक पर्यायाची वर्तुळे रंगविणे बंधनकारक आहे.
४. 'दोन अचूक पर्याय निवडा' अशी सूचना दिलेल्या प्रश्नाव्यतिरिक्त इतर प्रत्येक प्रश्नासाठी एकापेक्षा अधिक रंगविलेली वर्तुळे ग्राह्य धरली जाणार नाहीत.
५. एकदा रंगविलेले वर्तुळ बदलता येणार नाही.
६. खाडाखोड केलेल्या, अर्धवट भरलेल्या वर्तुळाच्या उत्तरास शून्य गुण दिले जातील.
७. उत्तरपत्रिकेस घडी घालू नये, स्टेपल करु नये तसेच उत्तरपत्रिकेवर खाडाखोड करु नये.
८. उत्तरपत्रिका फाटल्यामुळे अथवा खराब झाल्यामुळे उत्तरपत्रिकेत रंगविलेले पर्याय दिसत नसतील तर सदर प्रश्नांचे गुण दिले जाणार नाहीत. त्यासाठी उत्तरपत्रिका व्यवस्थितपणे हाताळावी.
९. या उत्तरपत्रिकेसोबत असलेली कार्बनलेस कॉपी विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या अंतिम निकालापर्यंत स्वतःकडे जतन करावी.

**उत्तरे नोंदविण्याच्या योग्य पध्दती**

(1) ● (3) (4)
(1) (2) ● ●

**चुकीच्या पध्दती**

(X) (2) (3) (4)
(1) (2) (3) (4)
(1) (2) (3) (4)
(1) (2) (3) (4)

| प्र.क्र. | उत्तरांचे पर्याय | प्र.क्र. | उत्तरांचे पर्याय | प्र.क्र. | उत्तरांचे पर्याय |
|---|---|---|---|---|---|
| 1 | (1) (2) (3) (4) | 26 | (1) (2) (3) (4) | 51 | (1) (2) (3) (4) |
| 2 | (1) (2) (3) (4) | 27 | (1) (2) (3) (4) | 52 | (1) (2) (3) (4) |
| 3 | (1) (2) (3) (4) | 28 | (1) (2) (3) (4) | 53 | (1) (2) (3) (4) |
| 4 | (1) (2) (3) (4) | 29 | (1) (2) (3) (4) | 54 | (1) (2) (3) (4) |
| 5 | (1) (2) (3) (4) | 30 | (1) (2) (3) (4) | 55 | (1) (2) (3) (4) |
| 6 | (1) (2) (3) (4) | 31 | (1) (2) (3) (4) | 56 | (1) (2) (3) (4) |
| 7 | (1) (2) (3) (4) | 32 | (1) (2) (3) (4) | 57 | (1) (2) (3) (4) |
| 8 | (1) (2) (3) (4) | 33 | (1) (2) (3) (4) | 58 | (1) (2) (3) (4) |
| 9 | (1) (2) (3) (4) | 34 | (1) (2) (3) (4) | 59 | (1) (2) (3) (4) |
| 10 | (1) (2) (3) (4) | 35 | (1) (2) (3) (4) | 60 | (1) (2) (3) (4) |
| 11 | (1) (2) (3) (4) | 36 | (1) (2) (3) (4) | 61 | (1) (2) (3) (4) |
| 12 | (1) (2) (3) (4) | 37 | (1) (2) (3) (4) | 62 | (1) (2) (3) (4) |
| 13 | (1) (2) (3) (4) | 38 | (1) (2) (3) (4) | 63 | (1) (2) (3) (4) |
| 14 | (1) (2) (3) (4) | 39 | (1) (2) (3) (4) | 64 | (1) (2) (3) (4) |
| 15 | (1) (2) (3) (4) | 40 | (1) (2) (3) (4) | 65 | (1) (2) (3) (4) |
| 16 | (1) (2) (3) (4) | 41 | (1) (2) (3) (4) | 66 | (1) (2) (3) (4) |
| 17 | (1) (2) (3) (4) | 42 | (1) (2) (3) (4) | 67 | (1) (2) (3) (4) |
| 18 | (1) (2) (3) (4) | 43 | (1) (2) (3) (4) | 68 | (1) (2) (3) (4) |
| 19 | (1) (2) (3) (4) | 44 | (1) (2) (3) (4) | 69 | (1) (2) (3) (4) |
| 20 | (1) (2) (3) (4) | 45 | (1) (2) (3) (4) | 70 | (1) (2) (3) (4) |
| 21 | (1) (2) (3) (4) | 46 | (1) (2) (3) (4) | 71 | (1) (2) (3) (4) |
| 22 | (1) (2) (3) (4) | 47 | (1) (2) (3) (4) | 72 | (1) (2) (3) (4) |
| 23 | (1) (2) (3) (4) | 48 | (1) (2) (3) (4) | 73 | (1) (2) (3) (4) |
| 24 | (1) (2) (3) (4) | 49 | (1) (2) (3) (4) | 74 | (1) (2) (3) (4) |
| 25 | (1) (2) (3) (4) | 50 | (1) (2) (3) (4) | 75 | (1) (2) (3) (4) |

**पर्यवेक्षकांनी स्वतः भरावे.**

उपस्थित (P)

अनुपस्थित (A)

सोडविलेल्या प्रश्नांची संख्या ☐

न सोडविलेल्या प्रश्नांची संख्या ☐

एकूण प्रश्न संख्या: 75

विद्यार्थ्याची स्वाक्षरी ..........

पर्यवेक्षकाचे नाव : ..........

स्वाक्षरी : ..........